**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**
मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग एलफिन्स्टन,मुंबई-४०००१३.
दूरध्वनी:२४३०६७१७/२४२२७७५८/२४३६०७३८ फॅक्स २४२१००१९

संदर्भ : मका/ग्रंथालय/२०१४-१५/२९६ दिनांक: २३.०७.२०१४

## सुधारित परिपत्रक

**विषय : ग्रंथालय वाचनसाहित्य रद्दबातल धोरण.**
**संदर्भ : १. मका/ग्रंथालय/२०१३-१४/२२३ दिनांक: १९.१०.२०१३**
**२. मा. कल्याण आयुक्तांनी दि.१६.०७२०१४ रोजी मान्य केलेली टिप्पणी.**

उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या ग्रंथालयांकरिता ग्रंथालय वाचनसाहित्य रद्दबातल धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या मुद्दा क्रमांक आठमध्ये गहाळ पुस्तकांच्या वसुलीबाबत पुस्तकाची सध्याची किंमत काढण्याचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे.

संदर्भ क्र.२ नुसार सदर सूत्रात बदल करण्यात येत असून यापुढे ग्रंथालयातील गहाळ पुस्तकांची वसुली उपरोक्त सुत्रानुसार करण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी गहाळ पुस्तकास जबाबदार सभासद अथवा कर्मचारी यांच्याकडून गहाळ पुस्तकाची मूळ छापिल किंमत वसुल करण्यात यावी.

तसेच संबंधित सभासद अथवा कर्मचारी गहाळ पुस्तकाची बदली प्रत उपलब्ध करुन देत असेल तर त्यास ग्राह्य मानण्यात यावे व रजिस्टरमध्ये नोंद करुन पुस्तक दाखल करुन घ्यावे.

प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी
मा. कल्याण आयुक्तांकरिता

**प्रत सादर,**
मा. कल्याण आयुक्त, म. का. मुंबई

**प्रत:-**
१) सर्व अधिकारी, म.का.मुंबई/का.क्री.भवन, मुंबई
२) सहा.कल्याण आयुक्त/प्र.सहा.कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
३) सहा.लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये.
४) कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये.
५) सर्व केंद्र प्रमुख व ग्रंथालय कर्मचारी

**टीप** – गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.